D

**महाराष्ट्र पोलीस**
**सांगली जिल्हा पोलीस भरती सन २०२४-२५**
**पोलीस शिपाई या पदासाठी प्रश्नपत्रिका**

वेळ - ९० मिनिटे | एकूण प्रश्न - १००
दिनांक - १५/०३/२०२६. | एकूण गुण - १००

---

| ऑनलाईन आवेदन अर्ज क्रमांक | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |

| उमेदवाराची स्वाक्षरी |
|---|
| |

## उमेदवारासाठी सुचना

१) प्रश्नपत्रिका पडताळून घ्यावी व काही दोष आढळल्यास तात्काळ पर्यवेक्षकांकडून प्रश्नपत्रिका बदलून घ्यावी.
२) प्रश्नपत्रिकेवरील असलेला संचाचा क्रमांक ( A / B / C / D ) हा उमेदवाराने उत्तरपत्रिकेवरती न चुकता नोंदवावा.
३) प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण १०० प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण प्रमाणे ही परिक्षा १०० गुणांची आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
४) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. ( निगेटिव्ह मार्किग नाही )
५) हॉल तिकिट व उत्तरपत्रिकेवरील दिलेल्या सर्व सुचनांचे उमेदवारांनी वाचन करावे.
६) कच्चे काम करणेसाठी उमेदवारांना प्रश्नपत्रिकेमध्ये जागा दिलेली आहे. त्याठिकाणी उमेदवार यांनी कच्चे काम करावे.
७) परिक्षेची वेळ संपेपर्यत कोणीही परिक्षा हॉलच्या बाहेर विनापरवानगी जाणार नाही.
८) प्रश्नपत्रिका परिक्षेनंतर पर्यवेक्षकांकडे जमा कराव्यात.
९) पान क्र.०२ व १२ हे कच्चे कामासाठी वापरावे.

## ताकीद

या प्रश्नपत्रिकेसाठी विहीत केलेली वेळ संपेपर्यत ही प्रश्नपत्रिका सांगली पोलीसांची मालमत्ता असून ती परिक्षा कक्षात उमेदवाराला परिक्षेसाठी देण्यात आलेली आहे. ही वेळ संपेपर्यत सदर प्रश्नपत्रिकेची प्रत, प्रती, किंवा सदर प्रश्नपत्रिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीविरोधात प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

**पोलीस अधीक्षक सांगली.**

**कच्चे कामासाठी**

प्रश्न क्र.१ AZ, BY, CX, DW, ?

अ) GH ब) HT क) EV ड) IQ

प्रश्न क्र.२ खालीलपैकी कोणता रंग प्राथमिक रंग नाही ?

अ) लाल ब) निळा क) हिरवा ड) पिवळा

प्रश्न क्र.३ १०१, १०११, ....., १११०१

अ) १०११ ब) ११११ क) १०१० ड) १११०

प्रश्न क्र.४ जर CAT = 24, DOG = 26, तर HORSE साठी कोणता अंक असेल ?

अ) 56 ब) 65 क) 64 ड) 66

प्रश्न क्र.५ गटातील विसंगत घटक ओळखा

अ) लोखंड ब) पारा क) तांबे ड) जस्त

प्रश्न क्र.६ सिताफळाला आंबा म्हटले, आंब्याला आवळा म्हटले, आवळयाला पेरु म्हटले, पेरुला लिंबू म्हटले, लिंबूला फणस म्हटले, फणसाला केळी म्हटले तर फळांचा राजा कोण ?

अ) सिताफळ ब) लिंबू क) आवळा ड) पेरु

प्रश्न क्र.७ एका सांकेतिक भाषेत FRIEND हा शब्द COFBKA असा लिहितात. तर RIGHT हा शब्द कसा लिहाल ?

अ) OFDEQ ब) QEDFC क) PDFCQ ड) TFCQE

प्रश्न क्र.८ ५ बगळे ५ मासे ५ मिनिटात खातात तर १ बगळा १ मासा किती मिनिटात खाईल ?

अ) १ मिनिट ब) ५ मिनिटे क) १० मिनिटे ड) ४ मिनिटे

प्रश्न क्र.९ खाली दिलेल्या कोणत्या पर्यायातील तीन शब्दांनी प्रश्नातील आकृती दर्शविता येते ते ओळखा



अ) प्राणी, वाघ,हत्ती ब) सस्तन प्राणी, वटवाघुळ, देवमासा क) अ व ब दोन्ही चुक ड) अ व ब दोन्ही बरोबर

प्रश्न क्र.१० राणी हिचा जन्म रविवार दिनांक १ डिसेंबर १९९६ रोजी झाला असेल तर राणीचा ७ वा वाढदिवस कोणत्या दिवशी येईल ?

अ) रविवार ब) सोमवार क) बुधवार ड) शनिवार

प्रश्न क्र.११ फोटो काढण्यासाठी ०५ मुली एका बाकावर बसलेल्या आहेत. रमाच्या लगेचच डावीकडे सविता बसलेली आहे. स्वातीच्या लगेचच डावीकडे संगीता बसलेली आहे. संगीताच्या लगेचच डावीकडे भाविका बसलेली आहे.तर मध्यभागी कोण बसले आहे ?

अ) सविता ब) संगीता क) स्वाती ड) रमा

प्रश्न क्र.१२ ०६ वाजून २० मिनिटानी घडयाळाच्या दोन काटयात किती अंशाचा कोण येईल ?
अ) $८०^{\circ}$ ब) $७०^{\circ}$ क) $६०^{\circ}$ ड) $९०^{\circ}$

प्रश्न क्र.१३ "हिचे सासरे ज्यांचे वडील, त्यांचे सासरे माझे वडील आहेत." एका स्त्रीची ओळख करुन देताना गजाभाऊ म्हणाले तर ती स्त्री गजाभाऊंची कोण ?
अ) पत्नी ब) बहीण क) भाची ड) वहिणी

प्रश्न क्र.१४ रमेशचे वय सुरेशच्या वयाच्या तिप्पट आहे. दोघांच्या वयातील फरक १६ वर्षे असल्यास त्या दोघांच्या वयाची बेरीज किती
अ) ३० वर्षे ब) २० वर्षे क) ३२ वर्षे ड) २५ वर्षे

प्रश्न क्र.१५ सुमन घराकडे तोंड करुन उभी होती, तिच्या उजव्या बाजुला उत्तर दिशा होती, ती ३ वेळा काटकोनात डावीकडे वळाली तर आता घर तिच्या कोणत्या बाजुला आहे ?
अ) डाव्या ब) उजव्या क) समोरच्या ड) मागच्या

प्रश्न क्र.१६ एका शेतामध्ये पाच कोंबडया, दोन डझन बदके व दहा गाई आहेत. तर त्या शेतामधील या कोंबडया, बदके व गायी यांच्या डोके व पाय यांची बेरीज किती ?
अ) १३५ ब) १३७ क) १३९ ड) १४१

प्रश्न क्र.१७ गटात न बसणारा पर्याय ओळखा
अ) दोन्ही बहिणी ब) सर्व मुले क) पाची पांडव ड) चौघे भाऊ

प्रश्न क्र.१८ सर्व मासे कासव आहेत. काही मगर मासे आहेत.
निष्कर्ष : (१) काही मगर कासव आहेत.
(२) कोणतेही कासव मगर नाही.
अ)निष्कर्ष (१) योग्य ब) निष्कर्ष (२) योग्य क) दोन्ही योग्य ड) एकही नाही

प्रश्न क्र.१९ महेशचा वर्गात वरुन पाचवा, तर खालून बत्तीसावा नंबर आहे, तर महेशच्या वर्गात एकूण मुले किती ?
अ) ३५ ब) ३४ क) ३७ ड) ३६

प्रश्न क्र.२० हेमंतजवळ सुमंतच्या तिप्पट रुपये आहेत. दोघांचे मिळून २८ रुपये होतात तर हेमंतजवळ सुमंतपेक्षा किती रुपये जास्त आहेत ?
अ) १० ब) १४ क) १२ ड) १६

प्रश्न क्र.२१ एका स्पर्धेत १२ संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघ दुसऱ्या संघाबरोबर एक सामना खेळतो तर एकूण सामने किती होतील ?
अ) ६६ ब) ६४ क) ६८ ड) ६२

प्रश्न क्र.२२ ठिक ४ वाजता आरशात किती वाजले असतील ?

अ) ६ ब) ४ क) ८ ड) १०

प्रश्न क्र.२३

| | |
|---|---|
| १३ | १२१ |
| २ | |

| | |
|---|---|
| १९ | २५६ |
| ३ | |

| | |
|---|---|
| ९ | ? |
| ४ | |

अ) २५ ब) ३६ क) ४९ ड) २०

प्रश्न क्र.२४ बोट : स्पर्श :: मेंदू : ?

अ) वाचन ब) हालचाल क) निरीक्षण ड) विचार

प्रश्न क्र.२५ एक दोरी १२ ठिकाणी कापली असता तिचे किती तुकडे होतील ?

अ) १० ब) १२ क) ११ ड) १३

प्रश्न क्र.२६ . . . . . हे अभयारण्य गव्यांसाठी पश्चिम महाराष्ट्रात प्रसिध्द आहे.

अ) सागरेश्वर ब) चांदोली क) दाजीपूर ड) कोयना

प्रश्न क्र.२७ उस्मानाबादी . . . . . ही जात भारतात प्रसिध्द आहे.

अ) गाय ब) शेळी क) म्हैस ड) मेंढी

प्रश्न क्र.२८ भारताचा मध्यबिंदू झिरो मैल (Zero Mile) कोठे आहे ?

अ) रायपूर ब) नागपूर क) जबलपूर ड) जौनपूर

प्रश्न क्र.२९ मोसाद ही गुप्तहेर संस्था कोणत्या देशाची आहे ?

अ) इराण ब) कॅनडा क) इस्त्राईल ड) रशिया

प्रश्न क्र.३० भारतीय अंतरिक्ष कार्यक्रमाचे पितामह कोण होते ?

अ) डॉ.सी.व्ही.रमण ब) डॉ.मेघानंद सहा क) डॉ. विक्रम साराभाई ड) डॉ. होमी जे. भाभा

प्रश्न क्र.३१ जोडया लावा

A) पिवळी क्रांती I) अन्नधान्य
B) निळी क्रांती II) तेलबियाने
C) श्वेत क्रांती III) दूध उत्पादने
D) हरित क्रांती IV) मत्स्य उत्पादने

अ) A-II, B-IV, C-III, D-I ब) A-II, B-III, C-IV, D-I क) A-IV, B-III, C-I, D-II ड) A-IV, B-I, C-III, D-II

प्रश्न क्र.३२ सेवा क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे . . . . . क्षेत्र होय.

अ) प्राथमिक ब) व्दितीयक क) तृतीयक ड) चतुर्थ

प्रश्न क्र.३३ नीती आयोगाचे पदसिध्द अध्यक्ष कोण असतात ?
अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) अर्थमंत्री ड) गृहमंत्री

प्रश्न क्र.३४ रेपो व रिव्हर्स रेपो रेट ही संज्ञा कशाशी संबंधित आहे.
अ) निर्यात धोरण ब) सार्वजनिक कर्ज क) आयात - निर्यात ड) रिझर्व बँकेचे पतधोरण

प्रश्न क्र.३५ कोणत्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने सरकारी मालकीची असतात.
अ) मिश्र ब) समाजवादी क) भांडवलशाही ड) सहकारी

प्रश्न क्र.३६ कोणत्या घटना दुरुस्तीने भारतीय घटनेच्या सरनाम्यात समाजवादी, धर्मनिरपेक्ष व अखंडता या शब्दांची भर घातली.
अ) ४१ वी ब) ४२ वी क) ४३ वी ड) ४४ वी

प्रश्न क्र.३७ भारताच्या राष्ट्रगीताचे रचनाकार कोण व ते गाण्यासाठी किती वेळ लागतो.
अ) रविंद्रनाथ टागोर व ५२ सेकंद ब) बंकीमचंद्र चटर्जी व ५४ सेकंद क) पं. मदनमोहन मालवीय व ५८ सेकंद ड) डॉ. महंमद इक्बाल व ५६ सेकंद

प्रश्न क्र.३८ . . . . . हे भारताचे सर्वोच्च घटनात्मक प्रमुख असतात.
अ) पंतप्रधान ब) गृहमंत्री क) भारताचे मुख्य सरन्यायाधीश ड) राष्ट्रपती

प्रश्न क्र.३९ राज्यसभा सदस्यांचा कालावधी किती वर्षांचा असतो ?
अ) २ ब) ४ क) ६ ड) ५

प्रश्न क्र.४० भारत निवडणूक आयोग ही एक . . . . . संस्था आहे.
अ) घटनात्मक ब) वैधनिक क) लोक निर्वाचित ड) निमसरकारी

प्रश्न क्र.४१ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या त्रिस्तरीय रचनेत मुंबई शहरासाठी कोणती संस्था काम करते ?
अ) सिडको ब) बृहन्मुंबई महानगरपालीका क) एमएमआरडीए ड) म्हाडा

प्रश्न क्र.४२ पोलीस प्रशासनासाठी गावपातळीवरील काम करणाऱ्या पोलीस पाटीलची नेमणूक कोणता विभाग करतो ?
अ) महसूल ब) पोलीस क) ग्रामविकास ड) पालकमंत्री कार्यालय

प्रश्न क्र.४३ खालीलपैकी कोणती सेवा आखिल भारतीय सेवा म्हणून ओळखली जात नाही ?
अ) भारतीय प्रशासकिय सेवा ब) भारतीय पोलीस सेवा क) भारतीय रेल्वे सेवा ड) भारतीय वन सेवा

प्रश्न क्र.४४ ' वर्दीतल्या माणसाच्या नोंदी ' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?
अ) श्री विश्वास नांगरे पाटील ब) श्री अरविंद इनामदार क) श्री हेमंत निंबाळकर ड) श्री सदानंद दाते

प्रश्न क्र.४५ खालील पदांचा विचार करता पोलीस आयुक्तालयातील पदसंरचनेचा योग्य चढता क्रम ओळखा.
A) पोलीस उप आयुक्त B) सह पोलीस आयुक्त C) सहाय्यक पोलीस आयुक्त D) अप्पर पोलीस आयुक्त

अ) C,D,A,B ब) C,A,D,B क) A,C,D,B ड) A,C,B,D

प्रश्न क्र.४६ सन २०२६ मध्ये ICC T-२० या स्पर्धेचा अंतिम सामना कोणत्या देशांच्या टिममध्ये खेळला गेला?

अ) भारत-न्युझीलंड ब) भारत-साऊथ अफ्रीका क) भारत-इंग्लंड ड) भारत-पाकिस्तान

प्रश्न क्र.४७ अमेरिका इराण युध्दात इराणच्या कोणत्या सर्वोच्च नेत्याचा नुकताच खात्मा करण्यात आला?

अ) नवाज शरिफ ब) झुल्फीकार भुट्टो क) अयातुल्लाह खोमेनी ड) रहीमतुल्लाह बगदादी

प्रश्न क्र.४८ स्वामी विवेकानंदाचे गुरु कोण होते ?

अ) महात्मा गांधी ब) स्वामी दयानंद सरस्वती क) स्वामी परमहंस ड) देवेंद्रनाथ टागोर

प्रश्न क्र.४९ महाराष्ट्रातील पश्चिम घाट ओलांडण्यासाठी खालील घाटांचा दक्षिणेकडून उत्तरेकडे योग्य क्रम लावा. I) फोंडा II) आंबा III) बोर IV) थळ

अ) I,II,III,IV ब) II,I,IV,III क) I,II,IV,III ड) II,I,III,IV

प्रश्न क्र.५० ध्वनीचा वेग खालीलपैकी कोणत्या माध्यमात सर्वाधिक असतो ?

अ) शुध्द पाणी ब) काच क) कोरडी हवा ड) पोलाद

प्रश्न क्र.५१ वाक्याचा अर्थ पुर्ण करणारा क्रियावाचक शब्द म्हणजे -

अ) विशेषण ब) क्रियापद क) स्वर ड) क्रियाविशेषण

प्रश्न क्र.५२ क्रियापद प्रकार ओळखा --- मधू पपई खातो

अ) मुख्य क्रियापद ब) सकर्मक क्रियापद क) विशेषात्मक क्रियापद ड) अकर्मक क्रियापद

प्रश्न क्र.५३ 'रमेश भेटल्याने आनंद झाला ' उद्‌गारार्थी शब्द बनवा

अ) काय, रमेश भेटला ! ब) रमेश भेटल्याने वा आनंद झाला ! क) रमेश भेटल्याने किती आनंद झाला ! ड) खुप आनंद झाला रमेश भेटला !

प्रश्न क्र.५४ एकच शब्द वाक्यात व्दि (दोन) आर्थाने वापरला तर कोणता अलंकार होतो.

अ) व्यतिरिक्त ब) रुपक क) श्लेष ड) अनन्वय

प्रश्न क्र.५५ खालील पैकी कोणते विशेष संयुक्त व्यंजन आहे.

अ) क् ब) ख् क) अ ड) ज्ञ्

प्रश्न क्र.५६ तत्पुरुष समास ओळखा

अ) घरोघरी ब) अपरंपार क) महादेव ड) रामलक्ष्मण

प्रश्न क्र.५७ वाक्य प्रकाराचा अर्थ ओळखा - गाढवे राखणे
अ) नुकसानभरपाई ब) राखन करणे क) काही काम नसणे ड) माहित नसणे

प्रश्न क्र.५८ पाहिलेले व प्रत्यक्षात खुप फरक असतो या अर्थाची खालीलपैकी म्हण कोणती
अ) शुलक गोष्टीचा विपर्यास ब) कान व डोळे यात चार बोटांचे अंतर असने क) करने थोडेच पण जास्त बडबड ड) काय गेले भोके राहिली

प्रश्न क्र.५९ वाक्यप्रचाराचा अर्थ सांगा - 'तेरडयाचा रंग'
अ) थोडयाच काळासाठी असणे ब) सारे अर्पण करणे क) पुर्णपणे सोडणे ड) गोरेमोरे होणे

प्रश्न क्र.६० 'विस्तव' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा -
अ) अनल ब) चंचल क) लाल ड) तप्त

प्रश्न क्र.६१ 'स्थितीस्थापक' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द -
अ) सजक ब) सतर्क क) पुष्कळ ड) ताठ

प्रश्न क्र.६२ 'अक्कल मिळकत खाणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ खालीलपैकी कोणता ?
अ) अनुभवाचे बोल ब) शहाणपण शिकविणे क) बुध्दीचा योग्य वापर ड) दुसऱ्याचे ऐकुण बोलने

प्रश्न क्र.६३ 'प्रमदा' अलंकार खालीलपैकी काणत्या आर्थाने वापरतात.
अ) प्रमाणासाठी ब) फुलासाठी क) सुंदर तरुणीसाठी ड) सुगंधासाठी

प्रश्न क्र.६४ 'तैलबुध्दी' चा अर्थ
अ) विसरभोळा ब) निसरडा क) बुध्दीमान ड) कंजुष मनुष्य

प्रश्न क्र.६५ एक + एक शब्दांचा संधी खालील प्रमाणे होतो.
अ) एक्क ब) एकेक क) एकक ड) ऐकक

प्रश्न क्र.६६ अ, उ, ए, क्, ओ, ऑ यापैकी कोणता स्वर नाही
अ) ए ब) ऑ क) ओ ड) क्

प्रश्न क्र.६७ मराठी भाषेमध्ये एकुण व्यंजने किती आहेत.
अ) ३५ ब) ३४ क) ३६ ड) ३२

प्रश्न क्र.६८ 'तत् + छत्र' शब्दाचा संधी
अ) तछत्र ब) तच्छत्र क) तद्त्र ड) ताच्छत्र

प्रश्न क्र.६९ खालीलपैकी 'समुदायवाचक' नसलेले नाम कोणते

अ) कळप  ब) घड  क) साखर  ड) समिती

प्रश्न क्र.७० काळ ओळखा 'रमेश पुस्तक वाचणार असेल'

अ) उद्देश भविष्यकाळ  ब) उद्देश वर्तमानकाळ  क) उद्देश भूतकाळ  ड) यापैकी नाही

प्रश्न क्र.७१ 'नाकाशी सुत धरणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ सांगा

अ) मानहाणी होणे  ब) मरणपंथाला लागणे  क) बारकाईने पहाणे  ड) वास घेणे

प्रश्न क्र.७२ 'एकादशीच्या घरी शिवरात्र' या म्हणीच्या अर्थाने खालीलपैकी कोणती म्हण आहे.

अ) घरचे झाले थोडे व्याहाने धाडले घोडे  ब) कोळसा कितीही उगाळला तरी काळाच  क) वळचणीचे पाणी ओढयाला  ड) आग खाईल तो कोळसा ओकेल

प्रश्न क्र.७३ ' पिंपळावरचा मुंजा' म्हणजे काय, अर्थ सांगा

अ) भूत झालेली व्यक्ती  ब) वृध्द व्यक्ती  क) सतत भटकणारी व्यक्ती  ड) कारस्थानी व्यक्ती

प्रश्न क्र.७४ ' लांच्छन ' याचा विरुध्दार्थी शब्द सांगा

अ) मोठा  ब) भूषण  क) नावडता  ड) प्रसिध्द

प्रश्न क्र.७५ मडक्यांची -उतरण, तारकांचा-पुंज तर गवताची

अ) जुडी  ब) पेंढी  क) रास  ड) ताटवा

प्रश्न क्र.७६ एका संख्येला १८ ने गुणण्याऐवजी चुकुन २६ ने गुणले तर गुणाकार मुळ गुणाकारापेक्षा ४८ ने जास्त आला तर ती संख्या कोणती ?

अ) ६  ब) ५  क) ४  ड) ३

प्रश्न क्र.७७ ४८ नंतर क्रमाने येणारी ३४ वी विषम संख्या कोणती ?

अ) ११३  ब) ११७  क) ११९  ड) ११५

प्रश्न क्र.७८ खालीलपैकी सर्वात लहान अपुर्णांक कोणता ?

अ) ५/३  ब) १२/१७  क) १५/१७  ड) ७/९

प्रश्न क्र.७९ $\dfrac{5}{(0.1)^2 \times (0.5)} =$

अ) 1000  ब) 100  क) 5000  ड) 0.001

प्रश्न क्र.८० दोन संख्यांचा मसावि व लसावि अनुक्रमे ८ व ४८ आहे जर त्यांच्यापैकी एक संख्या २४ आहे तर दुसरी संख्या कोणती ?

अ) ४८  ब) ३६  क) १६  ड) २४

प्रश्न क्र.८१ एका डब्यात काही चॉकेलेट आहेत. १२ मुलांना प्रत्येकी सारखे चॉकलेट वाटले तर ८ चॉकलेट उरतात. जर डब्यातील १४ मुलांना सारखे चॉकलेट वाटले तर १० चॉकलेट उरतात तर त्या डब्यात कीती चॉकलेट आहेत. ?

अ) ७० ब) २० क) ८० ड) ८४

प्रश्न क्र.८२ दोन नळाने टाकी ३ व ४ तासात भरते व तिसऱ्या नळाने २ तासात रिकामी होते जर तिन्ही नळ एकाच वेळी चालू केल्यास ती टाकी कीती वेळात भरेल किंवा रिकामी होईल ?

अ) ५ तास ब) ८ तास क) १० तास ड) १२ तास

प्रश्न क्र.८३ १४ मजूर रोज ८ तास काम करून एक काम ६० दिवसांत संपवतात. तेच काम १० मजुरांना ४८ दिवसांत संपवायचे असल्यास रोज कीती तास काम करावे लागेल ?

अ) १२ तास ब) १८ तास क) १६ तास ड) १४ तास

प्रश्न क्र.८४ ताशी ३६ किमी वेगाने धावणारी आगगाडी एक खांब २० सेकंदात ओलांडते तर त्या आगगाडीची लांबी कीती ?

अ) १६० मी. ब) २०० मी. क) १८० मी. ड) ३६० मी.

प्रश्न क्र.८५ एक रेल्वे एक उभ्या माणसाला २ सेकंदात ओलांडते आणि ६० मी. लांब प्लॅटफार्म ५ सेकंदात ओलांडते तर रेल्वेची लांबी कीती ?

अ) ५० मी. ब) ४० मी. क) ६० मी. ड) ८० मी.

प्रश्न क्र.८६ एक व्यक्ती प्रवाहाच्या दिशेने ४० किमी व प्रवाहाच्या विरुध्द दिशेने ३० किमी प्रत्येकी ५ तासात पोहते. तर संथ पाण्यातील वेग कीती ?

अ) ५ किमी/तास ब) ६ किमी/तास क) ७ किमी/तास ड) ८ किमी/तास

प्रश्न क्र.८७ एका वर्गातील ५० विद्यार्थ्यांचे सरासरी वय १४ वर्षे आहे.वर्ग शिक्षकासह त्यांच्या वयाची सरासरी १४.५ वर्षे आहे तर वर्ग शिक्षकाचे वय कीती ?

अ) २५.५ वर्षे ब) ३९ वर्षे क) ३९.५ वर्षे ड) ३७ वर्षे

प्रश्न क्र.८८ बसच्या तिकीटाचे दर २०% ने वाढले १ वर्षानंतर पुन्हा तिकीटाच्या दरात १०% वाढ झाली तर मूळ दरात किती टक्के वाढ झाली ?

अ) ३०% ब) ३२% क) २५% ड) १५%

प्रश्न क्र.८९ रमेशचा पगार सुरवातीस २०% ने कमी केला व नंतर १५% ने वाढवला तर पगारात एकूण शेकडा वाढ किंवा घट कीती झाली ?

अ) ५% घट ब) १२% वाढ क) ८% वाढ ड) ८% घट

प्रश्न क्र.९० एका बागेमध्ये ६०% नारळाची झाडे आहेत. नारळाच्या झाडाच्या २५% आब्यांची झाडे आहेत आणि आंब्याच्या झाडांच्या २०% सफरचंदाची झाडे आहेत.जर सफरचंदाची झाडे १५०० असतील तर बागेमध्ये एकूण झाडे कीती ?

अ) ५०००० ब) ५१००० क) ४५००० ड) ४८०००

प्रश्न क्र.९१ केशवने २५०० रुपये किंमतीची गाडी २००० रुपये किंमतीस विकली तर शेकडा तोटा किती ?

अ) २२% ब) २०% क) २५% ड) १५%

प्रश्न क्र.९२ एक वस्तु ५% तोटयाने विकली त्याऐवजी ५% नफ्याने विकली तर २१० रुपये जास्त मिळाले असते तर त्या वस्तुची खरेदी किंमत कीती ?

अ) २२०० रु. ब) २१०० रु. क) २००० रु. ड) १९५० रु

प्रश्न क्र.९३ एक फळविक्रेता १० रुपयेला ५ या दराने संत्री खरेदी करतो व १५ रुपयाला ६ या दराने विक्री करतो तर त्याला किती टक्के नफा मिळतो ?

अ) ५०% ब) ४०% क) ३०% ड) २०%

प्रश्न क्र.९४ एका रक्कमेचे दोन वर्षाचे सरळव्याज व चक्रवाढव्याज अनुक्रमे १६० रुपये व १६४ रुपये आहे तर ती रक्कम कोणती ?

अ) १२०० रु. ब) १४०० रु. क) १६०० रु. ड) १८०० रु.

प्रश्न क्र.९५ रमेश आपल्या पत्नीपेक्षा ०५ वर्षाने मोठा असून, पत्नी तिच्या मुलाच्या ५ पट वयाची आहे जर मुलाचे ३ वर्षापुर्वीचे वय ४ वर्ष असेल तर रमेशचे आजचे वय किती ?

अ) २४ वर्षे ब) २५ वर्षे क) ४२ वर्षे ड) ४० वर्षे

प्रश्न क्र.९६ दोन संख्यांचे गुणोत्तर ३:५ आहे.जर प्रत्येक संख्येत ७ मिळवले तर गुणोत्तर ११:१६ होते तर त्या संख्या काढा ?

अ) ७५ आणि १२५ ब) ४५ आणि ७५ क) ६० आणि १०० ड) यापैकी नाही

प्रश्न क्र.९७ १५ मिटरचे ४ किलोमीटरशी गुणोत्तर किती ?

अ) ३:८ ब) ८००:३ क) ३:८० ड) ३:८००

प्रश्न क्र.९८ खुर्ची व टेबल यांच्या किंमतीचे गुणोत्तर ३:७ आहे आणि टेबलाची किंमत ४४१ रुपये आहे तर खुर्चीची किंमत किती ?

अ) १२६ रुपये ब) १८९ रुपये क) २५२ रुपये ड) ३१५ रुपये

प्रश्न क्र.९९ एक दिवसात किती सेकंद असतात ?

अ) ६८४०० ब) ४६८०० क) ६४८०० ड) ८६४००

प्रश्न क्र.१०० समभुज त्रिकोणाची परिमीती २७ से.मी. आहे तर बाजू किती ?

अ) ९ से.मी. ब) १० से.मी. क) ९.५ से.मी. ड) १२ से.मी.

## कच्चे कामासाठी